हिंदु विवाह अर्ज क्र. ५१/२०२५
जुना वि.अर्ज क्र.७९/२०२२
निवृत्ती वि. मुक्ता
नि.क्र. ०/४७

**अर्जदारतर्फे साक्षीदार क्र. २.**

**शपथेवर सुरू:–**

नाव – ज्ञानेश्वर शंकर कड,

वय – ६१ वर्ष, व्यवसाय – सेवानिवृत्त,

रा. राजगुरू नगर, जि. पुणे.

**<u>साक्षीदार क्र. २ यांचा सरतपास विद्वान वकील श्री. एस. सी. बिराजदार यांचेमार्फत शपथेवर सुरुः–</u>**

पालवी सामाजिक संस्था, राजगुरू नगर या संस्थेअंतर्गत कौटूंबिक सल्ला मार्गदर्शन केंद्र चालवले जाते. सदर संस्था २०13 पासून चालवली जाते. या संस्थेची धर्मादाय आयुक्त कार्यालय, पुणे येथे नोंदणी करण्यात आली आहे. या संस्थेचा सचिव म्हणुन मी संस्थेच्या स्थापनेपासून काम पाहतो. कौटूंबिक समस्येवर सदर संस्था काम करते. मी माझ्या सोबत संस्थेचा अभिलेख घेऊन आलो आहे.

२. अर्जदार हे दि.२९/०६/२०२१ रोजी आमच्या संस्थेमध्ये आले होते. त्यांनी संस्थेमध्ये अर्ज दिला होता. मला यादी नि.क्र. ३७ सोबत अ.क्र. ३ वरील दि.२९/०६/२०२१ रोजीचा अर्ज दाखवला असता तो तोच आहे. त्यावर अर्जदाराची सही आहे. सदरचा अर्ज गैरअर्जदार ही अर्जदाराकडे नांदत नाही, सदरच्या अर्जामध्ये गैरअर्जदार काही कारण नसताना माहेरी निघुन गेली व तिला फोन केला असता ती नांदायला येणार नाही असे तिने सांगितले असा मजकुर नमुद होता. तसेच त्या अर्जामध्ये अर्जदार व

गैरअर्जदार यांचे जमते व अर्जदाराला गैरअर्जदारास नांदवायची इच्छा आहे असे देखील नमुद केले आहे व त्यासाठी संस्थेने सहकार्य करावे अशी विनंती केली आहे. सदरच्या अर्जास **नि.क्र. ४८** देण्यात येते.

३. दि.३०/०६/२०२१ रोजी गैरअर्जदारास संस्थेमार्फत उपस्थित राहण्यासाठी व त्यांची बाजु मांडण्यासाठी हजर राहण्याकरिता नोटीस पाठवण्यात आली होती. मला नि.क्र. ४२ वरिल नोटीस दाखवली असता त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर नोटीस गैरअर्जदारास मिळाली. सदर नोटीसीप्रमाणे गैरअर्जदार हे दि.१०/०७/२०२१ रोजी हजर झाले नाहीत. नोटीस देण्यापुर्वी आम्ही गैरअर्जदार यांना फोन करून तारखेला हजर राहण्यास सांगितले होते. परंतू, गैरअर्जदार याने तारखेला हजर राहण्यास जमणार नाही व १५ ते २० दिवसांनी फोन करून कळवतो असे सांगितले. त्यानंतर दि.२३/०७/२०२१ रोजी संस्थेतुन गैरअर्जदार यांना फोन करण्यात आला होता. त्यावेळेसही गैरअर्जदार यांनी उदया फोन करून सांगते असे सांगितले. पुन्हा दि.२७/०७/२०२१ रोजी गैरअर्जदार यांना संस्थेमार्फत फोन करण्यात आला परंतू त्यांनी तो फोन उचलला नाही.

४. दि.२९/०७/२०२१ रोजी दुसरी नोटीस संस्थेमार्फत रजिस्टर पोस्टाने गैरअर्जदारास पाठवण्यात आली. त्यानंतर गैरअर्जदार यांनी सदरची नोटीस घेण्यास इन्कार दिला व तसा शेरा मारून सदरचा लिफाफा आमच्या संस्थेला परत आली. मला यादी नि.क्र. ३७ सोबत अ.क्र. ४ वरिल लिफाफा दाखवला असता तो तोच आहे. त्यावर आमच्या संस्थेचा शिक्का आहे. त्यावर गैरअर्जदाराने लिफाफा घेण्यास इन्कार केला असा पोस्टाचा शेरा आहे. सदर लिफाफ्यास **नि.क्र. ४९** देण्यात येते.

५. मी संस्थेमध्ये सदर प्रकरणात प्रत्येक तारखेला काय झाले त्याबाबतचा रोजनामा लिहतो. त्याचे मुळ रजिस्टर मी आजरोजी माझ्यासोबत आणले आहे. मला नि.क्र.

४३ वरिल रोजनाम्याची सत्यप्रत दाखवली असता त्यावर संस्थेचा शिक्का आहे व सचिव म्हणुन माझी सही आहे. त्यातील मजकुर मी आणलेल्या मुळ केस प्रोसिडींग रजिस्टरप्रमाणे बरोबर आहे. या प्रकरणामध्ये गैरअर्जदार हजर झाली नाही म्हणुन त्यामधुन ठोस निष्कर्ष आम्हाला काढता आला नाही.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास गैरअर्जदारतर्फे विद्वान वकील श्री. एस. आर. शेख यांच्यामार्फत सुरू:–**

६. मी शिक्षक म्हणुन मामासाहेब मोहोळ शिक्षण संस्था, सिंहगड विदयालय सांगरुण, ता. मुळशी, जि. पुणे येथे १९९२ साली रूजु झालो. मी २०२३ मध्ये मामासाहेब मोहोळ शिक्षण संस्था प्रशाळा वासेरे, ता. खेड, जि. पुणे येथुन सेवानिवृत्त झालो. मी वासेरे, ता. खेड येथे १९९४ पासून माझ्या सेवानिवृत्तीपर्यंत कार्यरत होतो. मी इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत या वर्गांचा शिक्षक होतो. शाळेची वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ४.३० पर्यंत अशी होती. माझ्या घरापासून शाळा १५ कि.मी अंतरावर होती. मला घरापासून शाळेत जाण्यापर्यंत १५ ते २० मिनीटे वेळ लागत होता.

७. पालवी सामाजिक संस्था ही सन २०१३ साली नोंदणीकृत करण्यात आली. मी संस्थेची नियमावली आजरोजी माझ्यासोबत आणली नाही. पालवी सामाजिक संस्था कायदेशीररित्या चालवण्याकरिता देण्यात आली आहे याबाबतचा कागदोपत्री पुरावा मी याकामी दाखल केलेला नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, सदर कागदोपत्री पुरावा मी दाखल करू शकतो. पालवी सामाजिक संस्थेमध्ये ९ सभासद आहेत. मी संस्था चालू झाल्यापासून सचिव म्हणुन कार्यतर आहे. ज्या ज्या वेळी पालवी संस्थेची बैठक असते त्यावेळेस मी सचिव म्हणुन उपस्थित राहतो.

८. शासनाने पालवी सामाजिक संस्थेस महिला कौटुंबिक समस्या निवारण करण्याकरिता संस्थेला परवानगी दिल्याबाबत मी कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी

दाखल केलेला नाही. पालवी सामाजिक संस्थेमध्ये कौटुंबिक सल्ला केंद्राचे प्रकरण अध्यक्ष आणि इतर कर्मचारी यांच्यासमक्ष चालते.

९. अर्जदाराने माझ्याकडे वैयक्तिक अर्ज दिला नाही. संस्थेच्या कोणत्या कर्मचा–याने अर्ज दाखल करून घेतला त्याचे नाव मला माहित नाही. प्रकरण दाखल झाल्यानंतर नोटीस दिपाली मुळूक या कर्मचा–याने गैरअर्जदाराला काढली. दिपाली मुळूक आमच्या संस्थेमध्ये सभासद नाहीत ते आमच्या संस्थेचे कर्मचारी आहेत. दिपाली मुळूक यांना अंदाजे २०२० मध्ये संस्थेमध्ये रूजू करून घेण्यात आले होते. दिपाली मुळूक यांना संस्थेमध्ये २०२० साली रूजू करून घेतल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा मी याकामी दाखल करू शकत नाही.

१०. प्रकरण संस्थेचे अध्यक्ष, अर्जदार व मुलगी यांच्या समक्ष चालली. मुलगी म्हणजे कर्मचारी. सदर मुलीचे नाव दिपाली मुळूक आहे. प्रकरण अध्यक्ष व दिपाली मुळूक यांच्या समक्ष चालली याबाबत नि.क्र. ४३ वर नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार व गैरअर्जदार यांचे कौटूंबिक समस्येचे प्रकरण माझ्या समक्ष चालले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे प्रकरण माझे समक्ष चालले नसल्यामुळे त्यामध्ये काय झाले आहे व कसे याची माहिती मला नाही. न्यायालयाचे साक्षी समन्स मला पोस्टाने आले. मला साक्षी समन्स संस्थेच्या नावाने प्राप्त झाले. मला साक्ष देण्यासाठी संस्थेने अधिकारपत्र दिले नाही.

११. हे म्हणणे खरे नाही की, माझी अर्जदाराशी चांगली ओळख आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी अर्जदारासोबत पुण्याहुन आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. ४३ वरिल अर्जाच्या संदर्भाने संस्थेने चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि.२९/०७/२०२१ रोजी दुसरी नोटीस (नि.क्र.४९) गैरअर्जदाराला पाठवण्यात आली होती त्यावर घेण्यास इन्कार असा शेरा दि.१३/०७/२०२१ रोजीचा आहे.

१२. अर्जदाराने गैरअर्जदार व अर्जदार २०२१ साली आळंदी, पुणे येथे राहत असल्याबाबतची माहिती दिली नव्हती. नि.क्र. ४२ वरिल नोटीस संस्थेने गैरअर्जदाराला एकंबी वाडी, ता. औसा या पत्त्यावर पाठवली आहे. अर्जदाराने गैरअर्जदार ही कोठे राहते याबाबतचा पत्ता दिला नसल्याने संस्थेने चुकिच्या पत्त्यावर गैरअर्जदार हिला नोटीस काढली किंवा कसे याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार हिला नोटीस (नि.क्र.४२) मिळाली नाही. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार ही प्रकरणामध्ये हजर झाली नाही म्हणुन गैरअर्जदाराच्या वैवाहिक जिवनासंदर्भात संस्थेला माहिती मिळाली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृती,

Digitally signed by PARVEZ ISHAQUEKHAN MOKASHI
Date: 2026.01.30 12:54:49 +0530

(पी. आय. मोकाशी)

दिनांकः–२९.०१.२०२६. दिवाणी न्यायाधीश,व. स्तर, औसा.